## महत्त्वाचे

### जिजामाता स्कूलमध्ये गुरूपौर्णिमा उत्सव उत्साहात



**संगमनेर (प्रतिनिधी)** – येथील जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरा करण्यात आला. प्राचार्य संदीप डांगे व उपप्राचार्या माधुरी शेवाळे यांच्या हस्ते प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सहावीमधील विद्यार्थिनी अवनी साळुंके हिने आपल्या भाषणा-तून गुरु व शिष्य यांचे समाजातील स्थान तसेच गुरुंचे महत्व समजावून सांगितले. संगीत शिक्षिका अनुराधा श्रीमंदिलकर यांच्या सोबत सहावी व सातवीमधील विद्यार्थिनींनी ताल धरत 'गुरु माता पिता तुम हो, मेरे बंधू सखा तुम हो' हे गीत सादर केले. गुरुपौर्णिमा हा केवळ आपल्या आध्यात्मिक गुरुंचा सन्मान करण्याचा दिवस नाही तर जीवनाच्या विविध पैलूंमध्ये ज्यांनी आपल्याला मार्गदर्शन केले त्या सर्वांच्या सन्मानचा हा दिवस मानला जातो, असा मोलाचा संदेश प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना दिला. त्यासोबतच पूर्वप्राथमिक विभागातील मुलांनी देखील गुरु व शिष्य परंपरेची महानता सांगून आपल्या गुरुशिक्षकांना पुष्प देऊन आशीर्वाद घेत-ले. सूत्रसंचालन पाचवीमधील स्वरया कुटे व राधिका कुटे या विद्यार्थिनींनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन, प्रशासन, सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# वीरगाव फाटा ते वीरगाव रस्त्याच्या दुतर्फा चिखल

## छोट्या-मोठ्या वाहनचालकांत संतापाची भावना

**अकोले (प्रतिनिधी)** – तालुक्यातील वीर-गाव फाटा ते वीरगाव दरम्यान साईडपट्ट्यांवरील माती, मुरूम वाहून गेल्याने डांबरीच्या कडा पोसल्या आहेत. वाहनचालकांसाठी ही बाब धोकादायक बनली असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे रस्त्याच्या बाजूला चर खोदून तेथील माती डांबरी रस्त्याच्या कडेला टाकून साईडपट्ट्या भरण्याचे काम सुरू आहे. जेसीबीच्या साह्याने ऐन पावसाळ्यात हे काम करत असल्याने रस्त्याच्या दोन्ही बाजूला चिखल तयार झाला आहे. त्यावरून जाताना दुचाकी वाहने घसरतात तर चारचाकी वाहने चिखलात रुतून बसतात. यामुळे हा रस्ता वाहतुकीसाठी अत्यंत धोकादायक बनला असून वाहनचालकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे.

वीरगाव फाटा ते वीरगाव या डांबरी रस्त्याच्या बाजूच्या साईडपट्ट्या खचल्या असून वाहनांची वर्दळ तसेच पावसाने माती वाहून गेली आहे. सध्या पावसात डांबरी रस्त्याच्या बाजूच्या साईडपट्ट्यांचे काम सुरू आहे. हे काम करताना ठेकेदाराने चर खोदून गटार करताना तेथील माती रस्त्याच्या बाजूला टाकली आहे. सध्या पडत असलेल्या पावसामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूला चिखल झाला आहे. मोठी वाहने आल्यास लहान वाहनांना रस्ता सोडून खाली उतरून चिखलात जावे लागते. त्यात दुचाकीस्वार निसरड्या जागी सरकून



पडतात. तर मोठी वाहने समोरून आल्यास कार किंवा तत्सम वाहनांना चिखलात जाऊन अपघात होण्याची भीती वाटते. चिखलात टायर अडकून गाड्या फसत आहेत. रस्ता न दिल्याचा राग येऊन वाहन चालकांमध्ये वादावादी, भांडणे होत आहेत. वीरगाव फाटा ते पिंपळगाव निपाणीकडे जाणारा रस्ता इथपर्यंत याप्रकारे गटारीचा चर तयार करून माती दुतर्फा रस्त्यावर टाकली आहे. सध्या जोरदार पावसामुळे हे काम बंद असले तरी यापुढे अशाच प्रकारचे काम केले जाणार असल्याचे दिसते. या प्रकाराला जबाबदार असणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांवर तसेच ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# राहाता तालुक्यात सहकार सप्ताह साजरा

**राहाता (प्रतिनिधी)**– आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ आणि भारत सरकारच्या सहकार मंत्रालयाच्या स्थापना दिनानिमित्त महाराष्ट्र सहकार आयुक्त व निबंधक कार्यालय, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली राहाता तालुक्यात १ ते ४ जुलै २०२५ या कालावधीत मंगेश सुरवसे, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अहिल्यानगर यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, राहाता या कार्यालयाने विविध उपक्रमांचे आयोजन करून सहकार चळवळीबाबत जनजागृती करण्यात आली.

१ जुलै रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती येथे वृक्ष लागवडीचा उपक्रम राबविण्यात आला, ज्यामध्ये पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.२ जुलै रोजी राहाता तालुक्यातील सर्व पतसंस्थांसाठी शासनाकडील परिपत्रके आणि पतसंस्था नियामक मंडळाने दिलेल्या सूचनांबाबत मार्गदर्शनपर शिबीर आयोजित करण्यात आले. यावेळी सहाय्यक निबंधक नामदेव ठोंबळ, आणि राहाता मर्चन्ट पतसंस्थेचे व्यवस्थापक श्री. गायकवाड यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी तालुक्यातील पतसंस्थांचे व्यवस्थापक उपस्थित होते. ३ जुलै रोजी राहाता येथील शारदा विद्या मंदिरात शाळेतील ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. यावेळी सहाय्यक निबंधक श्री. ठोंबळ यांनी विद्यार्थ्यांना सहकार या विषयावर मार्गदर्शन केले. ४ जुलै रोजी तालुक्यातील सर्व विविध कार्यकारी सेवा सोसायटींसाठी संगणकीकरणाचे कामकाज आणि ई-ऑडीट या बाबत चर्चासत्र घेण्यात आले. यावेळी जिल्हा सहकारी बँकेचे तालुका विकास अधिकारी, तालुक्यातील सोसायट्यांचे सचिव, इन्फुज कंपनीचे प्रतिनिधी तसेच सहाय्यक निबंधक कार्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.



# गोदावरी उजव्या कालव्याच्या मजबुतीकरणाचे काम सुरु



सार्वमत इफेक्ट

**पुणतांबा (वार्ताहर)**– ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नामुळे गोदावरी उजव्या कालव्याचे मजबुतीकरण, खोलीकरण तसेच रुंदीकरणाचे काम अस्तगाव माथ्यापासून पुणतांबा टेलपर्यंत गेल्या दोन महिन्यांपासून अनेक यांत्रिक साधनांद्वारे वेगाने सुरू आहे.

खोलीकरणासाठी कालव्याच्या तळातील मुरूम उकरून कासाच्या दोन्ही बाजूला बरगडीला टाकला जातो आणि फोकलँडच्या बकेटने तो दाबला जातो. मात्र मध्यंतरी गोदावरी उजव्या कालव्याला पाणी आल्यानंतर बऱ्याच ठिकाणी मुरूम ढासळल्याचे प्रकार घडले. एवढेच नाही तर एक दिवस अधिक पाऊस पडल्यामुळे कालव्याच्या दुतर्फा केलेल्या रसावर साचलेले पाणी कालव्याच्या बाजूने उतार असल्यामुळे कालव्यात पडले.

त्यामुळेही ठिकठिकाणी वरंगळ्या पडलेल्या दिसून येत होत्या. त्यामुळे दुरुस्ती व मजबुतीकरणाच्या कामाबाबत शेतकरी वर्गात साशंकता निर्माण झाली होती. याबाबत दैनिक सार्वमतमध्ये ३० जूनच्या अंकात सविस्तर वृत्त प्रसिद्ध करण्यात आले.

या वृत्ताची अधिकाऱ्यांनी व ठेकेदाराने दखल घेतली असून आता तलाव कोरडा असल्यामुळे मजबुतीचे काम सुरू झाले आहे. त्यामुळे शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण पसरले आहे. दैनिक सार्वमतने कामाबाबत वसुस्थिती जनतेसमोर मांडल्याबद्दल अनेकांनी धन्यवाद दिले आहेत.

# मेहता कन्या विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात

**कोपरगाव (प्रतिनिधी)**– रयत शिक्षण संस्थेच्या कोपरगाव येथील डॉ. सी. एम. मेहता कन्या विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्सव कुंभारी येथील राघवेश्वर देवस्थानचे मठाधिपती श्री श्री १००८ राघवेश्वर नंदगिरी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

राघवेश्वर नंदगिरीजी महाराज यांनी विद्यार्थिनींना गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगताना भगवान शिव हे सर्वांचे गुरु असल्याचे सांगितले आणि गुरूंचे महत्त्व स्पष्ट केले. गुरु म्हणजे ज्ञानाचा भांडार असून जो निष्काम काम करतो, तो देवाला आवडतो. त्यामुळे त्यांनी निष्काम काम करण्याचा सल्ला दिला. आपली प्रथम गुरु म्हणजे आपल्याला जन्म देणारी माता असून तिचा सन्मान करावा लागतो. त्याचबरोबर गोमाता, धरणी माता, भारत माता यांचे पूजन करावे. धर्मामुळे तसेच धर्मग्रंथामुळे आपल्यावर चांगले संस्कार होतात. त्यामुळे धर्मग्रंथांचे वाचन करणे आणि खूप अभ्यास करून मोठे होणे आवश्यक आहे, असे आशीर्वाद त्यांनी दिले.

प्राचार्या अनिता धनक यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कृष्णा चिमणपूरे या विद्यार्थिनीने आपल्या भाषणातून गुरूंप्रती कृतज्ञता व्यक्त केली. विद्यालयातील सर्व गुरुजनांचा विद्यार्थिनींच्या वतीने श्रीफळ व गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी पुंडलिक थोरात, सोमनाथ निळकंठ, प्रवीण चिने, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष युसूफ रंगरेज, लहानु त्रिभुवन, प्रशांत चकोर, उपप्राचार्या उज्वला म्हस्के, पर्यवेक्षिका सुनीता पवार, पर्यवेक्षक प्रभाकर आभाळे, सुनीता वाबळे, दीपक भोये, विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थित होते.



# टाकळीभान हायस्कूलच्या २३ विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्ती परीक्षेत डंका

**टाकळीभान (वार्ताहर)**– रयत शिक्षण संस्थेच्या टाकळीभान येथील न्यू इंग्लिश स्कूल व आण्णासाहेब पटारे पाटील कनिष्ठ महाविद्यालयाच्या इयत्ता ५ वीच्या १ व इयत्ता ८ वीच्या २२ अशा एकूण २३ विद्यार्थ्यांनी माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करून डंका वाजवला आहे. त्यामुळे विद्यालयाच्या वतीने या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक आर.एम.शिंदे होते. तर व्यासपीठावर पर्यवेक्षक एस.एस.जरे उपस्थित होते. इ.५वीची विद्यार्थीनी तन्वी गलांडे हिने जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत ४० वा क्रमांक मिळविला, व इयत्ता आठवीचे २२ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले आहेत. विद्यालयातील इ. ५ वीची तन्वी गलांडे, इ. ८ वीचे वरद प्रदीप बोराडे, अमृता ज्ञानेश्वर शिंदे, आसिया आयुब सय्यद, वीरेन नंदकुमार जाधव, आदित्य अर्जुन शिंदे, शुभम किशोर बनकर, सार्थक नानासाहेब बोरुडे, सार्थक



अरुण शिंदे, मोहित काकासाहेब रणनवरे, सुप्रिया प्रसाद कदम, तुषार दादासाहेब सावंत, ओम सचिन भालसिंग, सार्थक विजय बहिरट, पार्थ प्रवीणबनकर, विशाखा राजेंद्र बोडखे, आरिफ सलीम सय्यद, आदिती विजय रणनवरे, समीक्षा ज्ञानेश्वर पवार, ओम गोपालसिंग हजारी, समृद्धी ठकचंद पटारे, शिवराज सुनील कांबळे, नागेश्वरी मोहन जगताप हे विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक ठरले आहेत. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक आर. एम. शिंदे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढीसाठी विद्यालयाच्या वतीने विविध उपक्रम राबविले जात आहेत, आणि माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा विद्यालयाचा लागलेला निकाल अभिमानास्पद आहे. पुढील शैक्षणिक वर्षातही विद्यार्थ्यांनी विद्यालयाचा नावलौकिक वाढवावा असे आवाहन शिंदे यांनी केले. शिष्यवृत्ती परीक्षेसाठी अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचा विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर शिष्यवृत्ती विभाग प्रमुख यू.टी. सुतार, एस.पी. कोकाटे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन जी.एस. काळे यांनी तर आभार एन.पी. चौधरी यांनी मानले.

# धनगरवाडीत ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

**धनगरवाडी (वार्ताहर)**– राहाता तालुक्यातील धनगरवाडी येथे रामगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हनुमान मंदिरात ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताह रविवार दि. १३ जुलै ते दि. २० जुलै पर्यंत आयोजित केला आहे.

व्यासपीठ चालक अशोक महाराज ठेंग व दत्तात्रय महाराज रकटे यांच्या उपस्थितीत सकाळी ज्ञानेश्वरी वाचन, दुपारी महाप्रसाद, तीन ते पाच ज्ञानेश्वरी वाचन, पाच ते सात हरिपाठ, पहाटे चार ते सात काकडा असे कार्यक्रम होणार असून शिवाजी महाराज खोंचे, आदित्य महाराज आदमाने, नवनाथ महाराज म्हस्के , दत्तगिरी महाराज, हरीशरणगिरी महाराज, अर्जुनगिरी महाराज, अशोक महाराज ठेंग आदींची किर्तन सेवा होणार आहे. रविवारी ९ ते ११ ज्ञानेश्वरी ग्रंथाची मिरवणूक, ११ वाजता रामगिरी महाराज यांचे काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होईल. तरी सर्व भाविकांनी संत दर्शन व ज्ञानामृत श्रवणाचा लाभ घ्याव असे आवाहन गायक व वादक मधुकर महाराज, रामभाऊ महाराज, आदित्य महाराज आदमाने, चंद्रकांत महाराज रकटे, विक्रम महाराज, वैभव महाराज भराडे, सरला बेट विद्यार्थी मंडळ धनगरवाडीच्या ग्रामस्थ व अहिल्यादेवी प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# राधाबाई काळे कन्या विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**कोळपेवाडी (वार्ताहर)**– पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता पाचवी व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत रयत शिक्षण संस्थेच्या सुरेगाव, कोळपेवाडी येथील राधाबाई काळे कन्या विद्या मंदिराच्या विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन केले.

या शिष्यवृत्ती परीक्षेत पाचवीच्या २७ विद्यार्थिनी पात्र झाल्या आहेत. सृष्टी संतोष थोरात या विद्यार्थिनीला २४६ गुण, ऋचा दिगंबर निंबाळकर हिला २३८ तर विधिजा विजय देहाडे हिने २३४ गुण मिळवून शिष्यवृत्तीधारक होण्याचा मान पटकावला आहे. इयत्ता आठवीच्या एकूण २१ विद्यार्थिनी पात्र झाल्या असून साक्षी राजेश रणवीरकर ही विद्यार्थिनी २५० गुण मिळवून शिष्यवृत्तीधारक झाली आहे. यशस्वी विद्यार्थिनींचे माजी आमदार अशोकराव काळे, स्थानिक स्कूल कमिटीच्या अध्यक्षा पुष्पाताई काळे,



रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभाग अध्यक्ष आ. आशुतोष काळे, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती तसेच पालक, ग्रामस्थ, शिक्षकांनी अभिनंदन केले. या विद्यार्थिनींना प्राचार्या सुशीला थोरात, उपप्राचार्या नीता केदार, पर्यवेक्षक किरण चांदगुडे, नितीन बारगळ, स्मिता पाटील, सुमन वसावे, सुनील सानप, प्रशांत मेढे, सचिन सुरजूसे, संजय राऊत, राजेंद्र चौधरी, सुभाष आलाम तसेच सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

# द्रोणा स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

**राहाता (तालुका प्रतिनिधी)** – राहता तालुक्यातील साकुरी येथील द्रोणा स्कूल व कॉलेजमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.

अध्यक्षस्थानी द्रोणा अकॅडमीच्या संचालिका प्राजक्ता दंडवते होत्या. चिमुरडे विद्यार्थी गुरु व शिष्याचा पेहराव करून स्कूलमध्ये दाखल झाले होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी त्यांच्या भाषणातून गुरुचे महत्व गोष्टीच्या रूपात सांगितले. तसेच चिमुरड्यांनी गुरुंबद्दल कविता व आपल्या मनातील गुरु बद्दलच्या भावना व्यक्त केल्या. यावेळी प्राजक्ता दंडवते म्हणाल्या, प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या गुरु विषयी आदर असला पाहिजे. पर्यावरण, निसर्ग, पशु, पक्षी, पुस्तके, इंटरनेट, संगणक, शाळा, शिक्षक अशा सर्व सजीव आणि निर्जीव गुरूंबद्दल कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपण त्यांच्याकडून जास्तीत जास्त ज्ञान प्राप्त केले पाहिजे. शाळेतील विद्यार्थ्यांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा सत्कार केला.

कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी



शिक्षकांचा गुलाब पुष्प देऊन सत्कार केला. तसेच यावेळी शिक्षकांनी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे नियोजन प्री प्रायमरी, प्रायमरी, कॉलेज व प्राचार्या अनिता रोहोम यांनी केले. सूत्रसंचालन राजनंदिनी जाधव हिने केले. संस्थेचे कार्यकारी विश्वस्त जयराज दंडवते, संचालिका प्राजक्ता दंडवते, संचालक अनुप दंडवते, प्राचार्या अनिता रोहोम यांनी सर्व शिक्षकांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.

# जनजाती कल्याण आश्रमच्या जिल्हाध्यक्षपदी कचरे

**अकोले (प्रतिनिधी)** – जनजाती कल्याण आश्रम अहिल्यानगरच्या जिल्हाध्यक्षपदी सेवानिवृत्त प्राचार्य संतोष कचरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

नाशिक येथे झालेल्या जनजाती कल्याण आश्रम पश्चिम महाराष्ट्र राज्याचे प्रांत उपाध्यक्ष डॉ. मधुकर आचार्य, उपाध्यक्षा कविता राऊत, प्रांत सचिव शरद शेळके, सहसचिव संदीप साबळे व प्रांत संघटन मंत्री अनिल पाटील यांनी या निवडीचा निर्णय घेतला.जनजाती (वनवासी) कल्याण आश्रम ही संस्था जनजाती जनतेच्या कल्याणासाठी देशभर काम करते.



अनेक प्रकारच्या योजना राबवून जनजा-ती समाज प्रगतशील होईल यासाठी सतत प्रयत्नशील असते. सेवानिवृत्त प्राचार्य संतोष कचरे हे अकोले तालुक्यातील पळसुंदे येथील रहिवासी असून हिंद सेवा मंडळ शिक्षण संस्थेत त्यांनी बारा वर्षे प्राचार्यपदी काम केलेले आहे. जनजाती समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी गेली तीस वर्षे सामाजिक संघटनेच्या माध्यमातून समाज जागृतीचे काम केले आहे. माजी मंत्री स्व. मधुकरराव पिचड यांचे ते विश्वासू कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. गेल्या पाच वर्षांपासून अहिल्यानगरचे जनजाती कल्याण आश्रमाचे उपाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. जनजाती समाजातील शिक्षण, रुढी-परंपरा, कुपोषण, धर्मांतर आदी बाबींचा अभ्यास करून समाज जागृती करण्याचे काम ते करत आहे. त्यांची जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्यामुळे या कामाला गती येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# संयुक्त पथकाकडून व्यावसायिकांच्या दुकानांची तपासणी मोहीम

**अकोले (प्रतिनिधी)** – सहाय्यक निबंधक सहकारी संस्था अकोले आणि कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संयुक्त पथकाकडून कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परवाना आणि विनापरवाना शेतमाल खरेदी करणाऱ्या व्यावसायिकांच्या दुकानांची तपासणी मोहीम मागील आठवड्यापासून राबविण्यास सुरुवात झाली आहे.

या तपासणी दरम्यान शेतमाल खरेदी-विक्री व्यवहार करणाऱ्या व्यापाऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती अकोलेकडून परवाना घेतला आहे काय? व्यापाऱ्यांनी साठा रजिस्टर ठेवले आहे काय? साठा रजिस्टर अद्ययावत भरले आहे काय? शेतकऱ्यांना अधिकृत खरेदी-विक्री बिले दिली जातात का? बिलावर परवाना क्रमांक, जीएसटी क्रमांक नमूद केले आहे काय? व्यापाऱ्यांनी दरवर्षी वजन काटे नोंदणी केली आहे काय? बाजार समितीला नियमाप्रमाणे नियमित सेस भरणा करतात काय? अशा प्रकारच्या प्रश्नावलीद्वारे तपासणी होत असून बहुतांश व्यापाऱ्यांच्या तपासणीत मोठ्या प्रमाणात उणिवा आढळून येत आहेत. अशा व्यापाऱ्यांकडून सात दिवसांत उणिवांची पूर्तता करण्याची संधी देण्यात आली असून तपासणीत आढळून आलेल्या उणिवांची पूर्तता न केल्यास महाराष्ट्र राज्य बाजार समिती अधिनियम १९६३ नियम १९६७ अन्वये कारवाई प्रस्तावित करण्यात येईल असे नमूद केले आहे. यामुळे व्यापारी वर्गात खळबळ उडाली असून यापुढे शेतकऱ्यांना नमुन्यात बिले देणे, साठा रजिस्टर अद्ययावत ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. आ-पला शेतीमाल विक्री करताना बिलाची मागणी करावी. तसेच २४ तासांत व्यापाऱ्याने रक्कम न दिल्यास बाजार पावतीसह बाजार समिती कार्यालयात तक्रार दाखल करावी, जेणेकरून आपली रक्कम वसूल करण्यात मदत होईल, असे आवाहन तप-ासणी पथकाने शेतकरी वर्गास केले आहे.